# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/02/2023 (सोमवार) सकाळ


---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील पिंपळगाव शिवार येथे दिनांक १९/०२/२०२३ चे ०९.२५ वा. ते ०९.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, पिंपळगाव शिवारात असलेल्या सुर नदीच्या पात्रात ट्रॅक्टरच्या साहायाने अवैधरीत्या रेतीची चोरी होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफने घटनास्थळी जावुन यातील ट्रॅक्टर क्र. एम. एच. —४०/सी ए—८६३८ चा चालक आरोपी नामे— रतन दादूजी रतनपूरे, वय ४३ वर्ष, रा. खात याने महालगाव शिवार येथील सूर नदीचे पात्रातून अवैधरीत्या व विनापरवाना त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर मध्ये रेती भरतांना मिळुन आले पोलीसांना पाहुन आरोपी ट्रॅक्टर चालक हा घटनास्थळाहुन ट्रॅक्टर सह पळू लागला फिर्यादीने आपल्या स्टाफसह आरोपी ट्रॅक्टर चालकाचा पाठलाग केला असता ट्रॅक्टर चालक हा महालगाव पिंपळगाव रोडनी पूलीया खालून ट्रॅक्टर काढून रेती रोडनी सांडवत सांडवत नेवू लागला त्यास स्टाफच्या मदतीने पिंपळगावचे पूलीयावर ट्रॅक्टर चालकास थांबवून त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव रतन दादूजी रतनपूरे, वय ४३ वर्ष, रा. खात असे सांगितले वरून त्यांना सदर ट्रॅक्टर ट्रॉली मधील रेती बाबत रॉयल्टी व ट्रॅक्टर ट्रॉलीची कागदपत्रे मागितले असता त्याच्यांजवळ रॉयल्टी कागदपत्रे नसल्याचे सांगितले. सदर ट्रॅक्टर मालक नामे— तूशार कुंजेकर, रा. खात यांचे सांगण्यावरून ट्रॅक्टर मध्ये महालगाव शिवार येथील सूर नदी येथून रेती भरून खात येथील राईस मील जवळ घेवून जात असल्याचे सांगितले. आरोपीतांच्या ताब्यातून १) ट्रॅक्टर एम एच ४० सी ए ८६३८ किंमती अंदाजे ५,००,०००/— रू. व विना नंबरची निळया पिवळया रंगाची ट्रॉली ज्यावर रंगनाथ इंजि. असे नाव लिहीले असलेली किंमती अंदाजे ९०,०००/—रू. ज्यामध्ये अंदाजे एक ब्रॉस रेती किंमती अंदाजे ३,०००/—रू असा एकूण वाहनासह ५,९३,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टरचे कागदपत्र व ट्रॅक्टर मालकाबाबत विचारपूस केली असता ट्रॅक्टर चालकाने कागदपत्रे सादर केले नाही. ट्रॅक्टर मालकाचे नाव सांगण्यास विलंब केल्याने आरोपी विरुदध गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— सहायक पोलीस निरीक्षक राजेश नानाजी जोशी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपींविरुध्द कलम ३७९, १०९ भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. ०१ सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १३३१ टिकाराम जाधव पोस्टे अरोली मो. नं. ८८३०९६५३४७ हे करीत आहे.




## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. पारशिवनी:** — दिनांक १८/२/२०२३ चे २३.०० वा. ते २३.४५ वा. दरम्यान पो.स्टे. पारशिवनी हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १४ वर्षे हिला यातील नमुद आरोपी नामे— सागर रामाजी भरडे, वय २५ वर्ष, रा. माहुली ता. पारशिवनी याने फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पळनाटे मो. नं ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी:** — दिनांक १९/०२/२०२३ ते ००.३० वा. दरम्यान पो.स्टे. पारशिवनी हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्षे हिला आरोपी नामे— राकेश टेकाम, वय २४ वर्ष, बोर्डा ता. रामटेक जि. नागपूर याने फिर्यादीचे राहते घराचे बाहेरून तिचे कायदेशीर रखावालीतुन फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पळनाटे मो. नं ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**